॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ

# दादासाहेब जोतीराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूज

Seen.

FOR EDUCATIONAL USE

# नीती आयोग

प्रकल्प नाव :-

# विषय

विद्यार्थ्याचे नाव :-

फडतरे अजित जनार्दन

हजेरी क्र :- ४६२

वर्ग :- T.Y.BCOM

विषय :- व्यावसायिक पर्यावरण

शिक्षकाचे नाव :-

प्रा. चव्हाण एस.के.

# वर्ष :-

# २०२२-२३

FOR EDUCATIONAL USE

# अनुक्रमणिका



| अ.क्र | विषय | पान क्र |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 5 |
| 2. | स्थापना | 6 |
| 3. | रचना | 7 |
| 4. | सदस्य | 8 |
| 5. | उद्दिष्टे | 9 |
| 6 | कार्ये | 10 |
| 7. | निष्कर्ष | 11 |
| 8. | संदर्भसूची | 12 |



FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

देशाच्या आर्थिक नियोजनात जवळजवळ ६५ वर्षे नियोजन आयोगाच्या सहकार्याने अनेक उद्दिष्टे साध्य केली नियोजन आयोगाची स्थापना १५ मार्च, १९५० साली झाली या आयोगाचे कामकाज ३१ डिसेंबर, २०१४ साली संपुष्टात आले. नियोजनबद्ध विकासासाठी नियोजन आयोगाने गेल्या ६५ वर्षात १2 पंचवार्षिक योजना आणि ६ वार्षिक योजना सादर केल्या त्यासाठी दोनशे लाख कोटींहून अधिक निधीचे वाटप करण्यात आले होते. तथापि. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी २०१४ मध्ये स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात "नियोजन आयोगाने आतापर्यंत आपली भूमिका योग्यरित्या पार पाडली आहे. पण आता काळ आणि गरजा बदलल्या आहेत. आता नव्या संस्थेची, नव्या कल्पनांची, नव्या दृष्टिकोनांची गरज आहे. राज्ये ही विकासाच्या केंद्रस्थानी असतील. गेल्या ६० वर्षात नव्हते तितके महत्त्व देशाच्या संघराज्य स्थलेला येऊ पाहत आहे" असे म्हटल्याने नियोजन आयोग संपुष्टात येणार हे स्पष्ट झाले होते

नियोजन आयोगाला पर्याय म्हणून मुख्यमंत्र्यांच्या सोबत झालेल्या बैठकीनंतर तीन आठवड्यांनी प्रधानमंत्र्यांनी नियोजन आयोगाचे नाव बदलून [National Institution For Transforming India -(NITI)] निती असे नवे नामकरण करण्यात आले अशा प्रकारे निती आयोग हा प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्य सरकारांना धोरण आखणीसाठी विचारगट म्हणून कार्यरत झाला आहे.

FOR EDUCATIONAL USE

# स्थापना

राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था [National Institute For Transforming India (NITI)] नीती आयोगाची स्थापना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ठरावाने 1 जानेवारी, २०१५ साली करण्यात आली. देशात पूर्वी ६५ वर्ष काम करणाऱ्या नियोजन आयोगाची जागा नीती आयोगाने घेतली आहे. नियोजन आयोगाऐवजी नीती आयोग करणार आहे. भारताच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक गरजा लक्षात घेऊन सरकारांना नवनवीन विकास कार्यक्रम सुचविणारा हा विद्वानांचा गट प्रधानमंत्र्यांच्या सरकारच्या वेगवेगळ्या अधिकार पदांवर कार्य करणाऱ्या तज्ञांचा हा गट सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी, सरकारला धोरण आखण्यासाठी व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करणार असून त्यात केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश व स्थानिकांना प्रतिनिधित्व असेल.

भारत हा विविध साधनसामग्रीने संपन्न असलेला देश असून प्रत्येक राज्य हे आर्थिक विकासाच्या वेगळ्या अवस्थेत स्वतःच्या गुणवैशिष्ट्यांनी गुणांनी समृद्ध आहे. प्रत्येक राज्याची काही बाबतीत न्यूनता आहे. या सर्व बाबी विचारात घेता सर्व देशांसाठी एकच विकासाचे धोरण आखणे योग्य होत नाही. त्यामुळे राज्याच्या व प्रदेशांच्या विकासात अडथळे निर्माण होतात. जागतिक स्पर्धात्मक युगात भारताला टिकून राहावयाचे असेल तर भिन्न प्रदेशासाठी स्वतंत्र धोरण योग्य ठरले. वरील सर्व बाबी लक्षात घेता भाजपप्रणीत आघाडी सरकारने देशांतर्गत व विदेशी धोरण यशस्वी करण्यासाठी नियोजन आयोग रद्द करून नीती आयोग स्थापन केला आहे.

FOR EDUCATIONAL USE

# रचना



अध्यक्ष :- प्रधानमंत्री

उपाध्यक्ष :- प्रधानमंत्री यांनी नियुक्त केलेले अर्थतज्ञ

नियामक परिषद :- गव्हर्निंग कौन्सिल - सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे गव्हर्नर जनरल

विभागीय परिषद :-

राज्यांमध्ये निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी यामध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे गव्हर्नर जनरलांच्या समावेश असतो ही परिषद प्रधानमंत्री किंवा त्यांच्यातर्फे नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असेल

तदर्थ सदस्य :-

संशोधन संस्थांकडून दोन पदसिद्ध सदस्य (बदली तत्वांवर) असतील

पदसिद्ध सदस्य :-

प्रधानमंत्री नामनिर्देशित केंद्रीय मंत्रिमंडळातील जास्तीतजास्त ४ सदस्य

मुख्य कार्यकारी अधिकारी :-

ठरावीक ~~नामनिर्देशित केंद्रीय मंत्रिमंडळातील~~ कालावधीसाठी प्रधानमंत्री नामनिर्देशित भारत सरकारच्या सचिव दर्जाच्या अधिकारी

सेक्रेटरी :-

स्वायत्त अधिकारी

FOR EDUCATIONAL USE

# सदस्य

<u>अध्यक्ष</u>: श्री नरेंद्र मोदी प्रधानमंत्री भारत
<u>उपाध्यक्ष</u>: डॉ राजीव कुमार
<u>पूर्ण वेळ सदस्य</u>: श्री व्ही के सारस्वत
प्रो रमेश चांद
डॉ व्ही के पॉल

<u>पदसिद्ध सदस्य</u>:-

| | | |
|---|---|---|
| i) श्री राजनाथ सिंग | - | संरक्षण मंत्री |
| ii) श्री अमित शहा | - | गृहमंत्री |
| iii) श्रीमती निर्मला सीतारामन | - | अर्थमंत्री |
| iv) श्री नरेंद्रसिंग तोमर | - | कृषिमंत्री |

<u>विशेष निमंत्रित</u>:-

| | | |
|---|---|---|
| i) श्री नितीन जयराम गडकरी | - | केंद्रीय मंत्री |
| ii) श्री थावरचंद गेहलोत | - | केंद्रीय मंत्री |
| iii) श्री पीयुष गोयल | - | केंद्रीय मंत्री |
| iv) श्री राव इंद्रजीत सिंग | - | केंद्रीय मंत्री |

<u>मुख्य कार्यकारी अधिकारी</u>:-
श्री अमिताभ कांत

वरील सर्व सदस्याचे नीती आयोगाचे सदस्य हे (दि. ०६-०६-२०१९ पासून) कार्यरत आहेत.

FOR EDUCATIONAL USE

# उद्दिष्टे

नीती आयोगाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

(i) विचारगटाशी सल्लामसलत :-

नीती आयोगाच्या विचार गटा-बरोबर केंद्र व राज्यांच्या पातळीवर चालू असलेल्या कार्यक्रमांना तात्त्विकदृष्ट्या व्यूहरचना आखण्यास व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यास मूलभूत धोरणांची अंमलबजावणी करताना सल्ला मसलतीने कार्य करणे.

(ii) सहकार्य वाढविणे :-

नीती आयोग केंद्र व राज्य सरकारे यांच्यात कार्यक्रम राबवताना सहकार्य वाढविण्याचे कार्य करील. राष्ट्रहित विचारात घेऊन कोणत्या बाबींना प्राधान्य द्यावयाचे याबाबत सल्ला देईल. राज्य सरकार बलवान झाले की देश बलवान होईल या हेतूने सहकारी संघराज्यांची निर्मिती करणे.

(iii) राज्यांच्या सहभागास महत्त्व :-

नीती आयोग केंद्र व राज्य सरकारांच्या विकास प्रक्रियेत आणीबाणीच्या स्थितीत कच्च्या मसुदा पुरवून कार्यक्रमांना योग्य दिशा देण्याचे, व्यूहरचना तयार करण्याची भूमिका पार पाडणे. पूर्वीचे नियोजन आयोग केंद्रात योजना आखून राज्यांकडे अंमलबजावणीसाठी सोपवत असे, आता नीती आयोगाच्या माध्यमातून कार्यक्रमाची आखणी करताना राज्यांच्या सहभागास महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

FOR EDUCATIONAL USE

# कार्ये

(i) जगाशी जुळवून घेणे :-

भारताच्या विकास प्रक्रियेत राष्ट्रा-राष्ट्रांत किंवा बहुविध संस्थांत, आंतरराष्ट्रीय संघटनात काही बाबतीत व्यूहरचना म्हणून जागतिक सुसंवाद साधण्यात नीती आयोग महत्त्वाची भूमिका पार पाडेल.

(ii) संघर्षाचे निराकरण :-

विभिन्न क्षेत्रात विभागीय अंतर्गत राज्याराज्यांत एवढेच नव्हे तर केंद्र व राज्यात अनेक मुद्द्यांवर समस्या अथवा काही वाद निर्माण झाल्यास सर्वमान्य व लाभदायक असा तोडगा काढण्याचे आणि गतीने त्याची कामगिरी घडवून आणण्याचे कार्य नीती आयोग करील.

(iii) एकसूत्रीपणा / मिलाफ :-

सरकारच्या विभिन्न पातळींवरील घटकात कृतिकार्यक्रमांत एकसूत्रीपणा निर्माण करण्याचे कार्य निती आयोग करणार आहे. जेव्हा समस्यांचे एकमेकांत पुनरुद्भव घडून येतात किंवा एकच समस्या विभिन्न घटकांत निर्माण होते तेव्हा त्यात सुसंवाद साधण्याचे, एकसूत्रीपणा निर्माण करण्याचे, एकत्रीकरण करून त्या सर्व घटकांचे मिलाफ घडवून आणण्याचे कार्य नीती आयोग करते.

(iv) इतर राष्ट्रीय विकास कार्यक्रम कृती राबवणे :-

नीती आयोगाकडून अनेक बाबतीत राष्ट्रीय विकास कार्यक्रम राबवले जातात. राज्य किंवा केंद्र सरकारचे विकासाचे प्रारूप राष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचे असतील तर तीसुद्धा राबविण्याची भूमिका नीती आयोग पार पाडेल.

FOR EDUCATIONAL USE

# निष्कर्ष

- "निती आयोगाची" 'स्थापना' कधी झाली या विषयाची संपूर्ण माहिती मिळाली.
- "नीती आयोगाची" कोणकोणती 'उद्दिष्टे' आहेत हे समजले.
- "नीती आयोगाची" कोणकोणती 'कार्ये' आहेत याची संपूर्ण माहिती मिळाली.
- "नीती आयोगाचे" 'सदस्य' यांच्या बद्दल संपूर्ण माहिती समजली
- "निती आयोगाच्या" संपूर्ण पुर्वीपासूनच्या 'इतिहास' समजला
- "नीती आयोगाची" संपुर्ण 'रचना' कशाप्रकारे आहे ते समजले.
- "निती आयोगाची" प्रस्तावना, स्थापना, उद्दिष्टे, माहिती, रचना व सदस्य यांचा सखोल अभ्यास करायला मिळाला.
- "नीती आयोगाची" संपूर्ण माहितीचा आढावा घेतला.

FOR EDUCATIONAL USE

# संदर्भसूची


- व्यावसायिक पर्यावरण विषय शिक्षिका
- T.Y.B.Com चे व्यावसायिक पर्यावरण पुस्तिका
- गट-चर्चेतून माहिती
- https://mr.m.wikipedia.org संकेतस्थळ
- https://informarathi07.com संकेतस्थळ
- नीती आयोग स्थापना आदेश
- नीती आयोग गठनाची अधिसूचना
- Google द्वारे माहिती.


10/10 Seen

FOR EDUCATIONAL USE